
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
व
छ. शिवाजी महाराज



“शूद्र पूर्वी कोण होते” या पुस्तकातून

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित

WHO WERE THE SHUDRAS ?

शूद्र

पूर्वी कोण होते ?



आहे. म्हणून शूद्रांना उपनयनाचा अधिकार होता, परंतु तो त्यांच्याकडून हिरावून घेण्यात आला, असा जो सिद्धांत आहे तोच खरा मानावा लागतो. शूद्रांचा उपनयनासंबंधीचा अधिकार का हिरावून घेण्यात आला याबद्दलची मी कारणे दिली आहेत.

(६)

तिसरा आक्षेप हा मुळी आक्षेपच नव्हे. ज्या माणसाला उपनयनाच्या सर्व खाचाखोचा संपूर्णपणे माहीत नाहीत तोच खरा, असे समजून त्याला उचलून धरण्याचा आग्रह करील.

आर्य समाज काही विधींना संस्कार समजत असत. असले संस्कार चाळीस आहेत. असे गौतम धर्मसूत्र (७-१४-२४) निवेदन करते ते संस्कार येणेप्रमाणे :-

गर्भाधान, पुसवन, सीमंतोत्रयन, जातकर्म, नामकर्म, अन्नप्राशन, कौल, उपनयन, वेदांचे चार व्रत, स्नान (किंवा समवर्तन), विवाह, दररोजचे पाच महायज्ञ(देव, पितृ, मनुष्य, भूत आणि ब्रम्ह याच्याकरिता), सात पकयज्ञ (आस्तक, पर्वणणस्थालिपाक, श्राद्ध, श्रावणी, अगृहयाणी, कैत्री, अश्वयुजी,) सात हविर्यश्र(ज्यात अर्घ्य जाळतात पण सोम अर्पण करीत नाहीत त्यांची नावे अभ्यध्येय, अग्निहोत्र, दर्शपूर्णमस, अग्रयन, चातुर्मास्य, निरूधपशुबंध व सौत्रमणि), सात सामयज्ञ (अग्निस्तोम, अत्याग्निस्तोम, उक्थ्य, षोडषिण, वाजपेय, अतिरात्र, आप्तोर्यम).

काही काळ लोटल्यानंतर संकुचित अर्थाने संस्कार म्हणजे काय व व्यापक अर्थाने संस्कार म्हणजे काय, असा संस्कारामध्ये फरक केला असावा असे दिसते. व्यापक अर्थाने जे संस्कार म्हणून समजले जात होते ते खरोखर यज्ञ होत आणि म्हणून त्यांची संस्कार या खऱ्या अर्थाने गणना करण्यात आली नव्हती. खऱ्याखुऱ्या अर्थाने जे संस्कार समजले जात होते, त्यांची संख्या सोळावर आणून सोडण्यात आली होती.

संस्कारासंबंधी विचित्रपणा असा काहीच बघावयास मिळत नाही. प्रत्येक समाज संस्काराला महत्व देतो. उदाहरणार्थ, बाप्तिस्मा, कन्फर्मेशन, विवाह, एक्स्ट्रीम, अंक्शन, युकॅरिस्ट, दी लॉर्डस् सपर आणि होली कम्युनियन यांना ख्रिस्ती लोक यांच्यात मतभेद आहे असे दिसते. ख्रिस्ती लोकांच्या कल्पनेप्रमाणे संस्कार म्हणजे काही विशिष्ट विधी केल्यानंतर परमेश्वराच्या कृपेने प्राप्त होणारी शुद्ध आध्यात्मिक अवस्था; तिला सामाजिक महत्व नाही. हिंदी-आर्य समाजात संस्कारांना प्रथमत: शुद्ध आध्यात्मिक महत्व होते. पूर्व मीमांसेचा कर्ता जैमिनी याने संस्काराबद्दल जे म्हटले आहे, त्यावरून हे स्पष्ट होते. त्याच्या मताप्रमाणे असा सर्वसाधारण सिद्धांत दिसतो की, त्यावरून संस्कार माणसाला दर्जा प्राप्त करून देतात. त्याचे दोन परिणाम दिसून येतात; ते अंगातील मलिन्य दूर करतात आणि नवे सदगुण उत्पन्न करतात. एखाद्याच्या अंगात संस्कार नसतील तर तो यज्ञ करण्यास पात्र होत नाही. संस्कार नसताना जर त्योन यज्ञ केला तर त्याला यज्ञाचे फळ मिळणार नाही. उपनयन हा एक संस्कार होता. इतर संस्काराप्रमाणे याचे महत्व

केवळ आध्यात्मिक महत्व होते. शूद्रांना उपनयन नाकारल्यामुळे साहजिकच उपनयनाच्या महत्वात फरक घडवून आणला गेला. त्यात पुढे सामाजिक महत्वाची भर पडली. पूर्वी त्याला सामाजिक महत्व मुळीच नव्हते. जेव्हा उपनयनाचा अधिकार प्रत्येकाला, आर्याला व अनार्याला होता, तेव्हा त्याला सामाजिक महत्व नव्हते. तो अधिकार साधारणत: सर्व लोकांचा होता. तो अधिकार काही थोड्या विवक्षित लोकांचा नव्हता. जेव्हा तो अधिकार शुद्रांपासून हिरावून घेतला, तेव्हा या अधिकाराचे महत्व मोठे होते, हा अधिकार धारण करणारा माणूस मोठा मानमरातब मिळवीत असे. उलट हा अधिकार नसलेला हीन दर्जाचा माणूस समजला जाऊ लागला. शूद्रांना उपनयनाचा अधिकार न दिल्यामुळे हिंदी-आर्य समाजात एक नवी प्रथा सुरू झाली. या प्रथेने शूद्रांना आपल्या वरील वर्गाकडे श्रेष्ठतम वर्ग म्हणून पाहण्याची दृष्टी आली व शूद्र हे कनिष्ठ आहेत अशी अहंगंडाची दृष्टी वरिष्ठ वर्गाकडे आली. उपनयन नष्ट झाल्यामुळे शूद्रांची जी अधोगती झाली ती अशी'.

उपनयनाची दुसरी उदाहरणे आहेत. पूर्व मीमांसेचे जे नियम आहेत त्यांचा विचार केला तर कोणालाही याबद्दल थोडी कल्पना येईल. (See Garganath Jha, Purva Mimansa pp368-369 and 171-172). यापैकी एक नियम असा आहे की, एखाद्याची जी इस्टेट आहे ती प्राय: यज्ञ कार्यासाठी तिचा उपयोग व्हावा, अशासाठी आहे. इस्टेटीवरचा हक्क हा यज्ञ करण्याच्या पात्रतेवर अवलंबून असतो. मनुस्मृती व इतर स्मृती यांनी स्त्रिया व शूद्र यांना इस्टेट करण्याचा व वेद शिकण्याचा अधिकार का दिला नाही, हे फार थोड्या लोकांना समजते. हे निर्बंध पूर्व मीमांसेतील नियमांचे नैसर्गिक परिणाम आहेत, ही गोष्ट लक्षात ठेवली तर या बाबतीतील गूढ आपोआप सुटते. स्त्रिया व शूद्र केवळ त्या स्त्रिया व शूद्र आहेत, म्हणून त्यांना इस्टेट करता येत नाही. (त्यांना यज्ञ करण्याचा अधिकार नाही म्हणून) हेच दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हटले तर ज्याला यज्ञ करण्याचा अधिकार नाही त्याला इस्टेट करण्याचा अधिकार नाही. यज्ञ करण्याचा अधिकार उपनयनावर अवलंबून आहे. याचा अर्थ असा की, उपनयनाचा अधिकार ज्यांना आहे त्यांनाच फक्त इस्टेट करण्याचा अधिकार आहे.

(पूर्व मिमांसेचा नियम असा आहे की, यज्ञात वैदिक मंत्र म्हटले पाहिजेत. म्हणजेच यज्ञ करणाराने वेदांचा अभ्यास केला असला पाहिजे. ज्याने वेदांचा अभ्यास केला नाही, तो यज्ञ करण्यास योग्य नाही. ज्यांचा उपनयनविधी झाला आहे, त्यांनाच वेदांचा अभ्यास करता येतो. हेच दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर, ज्ञानार्जन व विद्यार्जन म्हणजेच वेदाभ्यास उपनयनावर अवलंबून आहेत. ज्याचे उपनयन झाले नसेल त्याचा ज्ञानाकडील मार्ग बंद आहे. उपनयन हा दिसतो इतका साधा विधी नाही. इस्टेटीचा अधिकार, ज्ञानाचा अधिकार हा उपनयनाच्या दोन अत्यंत महत्वाच्या पायऱ्या आहेत.)

उपनयन नष्ट झाल्याने शूद्रांची अधोगती झाली, हे ज्यांना आकलन करता येत नाही त्यांनी वर सांगितलेले पूर्व मीमांसेतील नियम लक्षात ठेवले तर हा मुद्दा समजण्यास जड जाणार नाही. उपनयन व शिक्षण यांचे नाते काय आहे याची एकदा जाणीव झाली

तर केवळ उपनयन नष्ट झाल्यामुळे शूद्रांची अधोगती झाली, हा सिद्धांत समजण्याच्या बाबतीत जी अडचण भासते, ती दूर झालीच पाहिजे.

वर केलेल्या विवेचनावरून हे दिसून येईल की, प्राचीन आर्य समाजात उपनयनाच्या संस्काराला किती प्राधान्य देण्यात येत असे आणि त्याच्यावर माणसाचा सामाजिक दर्जा आणि माणसाचे वैयक्तिक हक्क कसे अवलंबून होते. ज्याला उपनयन नसेल त्या माणसाला सामाजिक अधोगतीच्या, अज्ञानाच्या आणि दारिद्र्याच्या गर्तेत लोटण्यात येत असे उपनयनविधी करण्याचे बंद करणे, हे भयंकर शस्त्र ब्राम्हणांनी शूद्रांच्याविरूद्ध सूड उगविण्यासाठी शोधून काढले. ॲटम बॉम्बप्रमाणे त्याचा परिणाम झाला. ब्राम्हणांच्याच शब्दात सांगावयाचे तर त्या शस्त्राने शूद्रांची स्मशानभूमी केली.

(७)

शूद्रांना उपनयन नाकारण्याचे सामर्थ्य ब्राम्हणांच्या अंगात होते त्याबद्दल वाद नाही. परंतु ब्राम्हणांच्या अंगात अशा प्रकारची शक्ती होती, याबद्दल कोठेही उल्लेख आढळत नाही, म्हणून या शक्तीबद्दल शंका घेण्यास वाव राहतो. ते काही असो. ज्यांना हिंदी-आर्य समाजाच्या धार्मिक शासनपद्धतीची माहिती नाही, त्यांच्या मनात जर वरील प्रकारची शंका उत्पन्न झाली असेल तर ती पुढील दोन गोष्टी लक्षात घेतल्या तर नष्ट होईल :- (१) उपनयनाच्या वेळी पुरोहितपणा करण्याचा ब्राम्हणांचा एकमेव हक्क, आणि (२) अनधिकृत उपनयनाच्या वेळी पुरोहितपणा करणाऱ्या ब्राम्हणाला सांगितलेल्या शिक्षा.

अगदी प्राचीन काळी बाप मुलाला गायत्री मंत्र शिकवित असावा व त्यानंतर त्या मुलाला वेदाभ्यास करता येत असावा. काही काळ लोटल्यानंतर उपनयनविधीचा समारंभ शोधून काढण्यात आला व त्याचा उपयोग करण्यात आला हे शक्य आहे. परंतु मुलाचा उपनयनविधी गुरूने म्हणजे आचार्याने कला पाहिजे, व मुलाने आचार्याच्या घरी जाऊन राहिले पाहिजे, ही रूढी फार पुरातन काळापासून रूढ झाली होती, त्याबद्दल वाद नाही.

आचार्य कोण असावा व त्याचे गुणधर्म व त्याची लायकी काय असावी, या प्रश्नाबद्दल फार प्राचीन काळापासून उहापोह होत आला आहे.

आचार्य वेदाभ्यासात पारंगत असले पाहिजेत. आपस्तंभ धर्मसूत्र (१-१-१,११ काणे, २) (१) पान ३२४ म्हणते, 'ज्या ब्रम्हचाऱ्याचे उपनयन विद्याहीन आचार्य करतो, तो ब्रम्हचारी एका काळोखातून दुसऱ्या काळोखात प्रवेश करतो. त्याचप्रमाणे तो विद्याहीन आचार्य एका काळोखातून दुसऱ्या काळोखात प्रवेश करतो.'

आपस्तंभ धर्मसूत्र (१-१-१२-१३) म्हणते की, उपनयन करण्यासाठी आचार्य असा शोधून काढावा की, जो अत्यंत विद्वान आहे, तयाचे कुटूंब वंशपरंपरागत विद्वत्तेत प्रवीण आहे, जो मनाने गंभीर आहे आणि अशाच आचार्याच्या हाताखाली ब्रम्हचर्य संपेपर्यंत मुलाने वेदांचा अभ्यास संपवावा. मात्र हा अभ्यास संपवताना तो आचार्य धर्मग्रंथापासून यत्किंचितही च्युत झालेला नसावा, हे मुलाने व त्याच्या बापाने पाहिले

पाहिजे.' या बाबतीत (Sam : p. 408) व्यासाचे मत असे आहे की, आचार्याने वेदाभ्यासाला सर्वस्वी वाहून घेतले असले पाहिजे. त्याला धर्माची उत्तम माहिती पाहिजे, त्याचा जन्म चांगल्या कुटूंबात झाला असला पाहिजे, तो स्वत: आचरणाने शुद्ध असला पाहिजे, आणि तो स्वत: आळशी नसला पाहिजे. ज्याने वेदाच्या एका शाखेचा अभ्यास केला आहे, त्याला श्रोत्रीय म्हणावे, अशी श्रोत्रीय म्हणावे, अशी श्रोत्रीय या शब्दाची व्याख्या करण्यात येते.

परंतु आचार्याची पहिली आणि सर्वात अधिक श्रेष्ठ लायकी म्हणजे तो ब्राम्हण असला पाहिजे. एखाद्या अडचणीच्या वेळी म्हणजे आचार्य उपलब्ध नसेल तर क्षत्रिय किंवा वैश्य आचार्य कामाला चालत असे. या बाबतीत विशेष विचित्र गोष्ट म्हणजे क्षत्रिय किंवा वैश्य आचार्याचे जे ब्राम्हण विद्यार्थी (ब्रम्हचारी) असत, त्यांना आचार्यांची सेवा करावी लागे. आचार्याच्या मागे ब्राम्हण विद्यार्थ्यांनी फिरले की, ही सेवा घडत असे. आचार्याचे अंग रगडणे, पाय धुणे वगैरे गोष्टी ब्राम्हण विद्यार्थ्यांना कराव्या लागत नसत.(आपस्तंभ धर्मसूत्र २,३,४,२५,-२८, गौतम ७, १-३; बौध स. १,२,४०-४२; मनू २, २४१ पहा.) याशिवाय असाही एक प्रघात रूढ होता की, ब्राम्हणाने क्षत्रिय किंवा वैश्य आचार्याकडे शिकण्याची इच्छा प्रदर्शित केली तरच त्या क्षत्रिय किंवा वैश्य आचार्याला ब्राम्हणाला शिकविता येत असे. क्षत्रिय किंवा वैश्य आचार्याला असूनही ब्राम्हणाला शिकविता येत नसे. वेद शिकणे आणि वेद शिकविणे यांच्यामध्ये जेव्हा फरक मानण्यात आला नव्हता तेव्हा हा अपवाद अस्तित्वात राहू दिला होता. हा फरक फार प्राचीन काळात मानण्यात आला. याच मुद्यावर वसिष्ठ आणि विश्वामित्र यांच्यामध्ये झगडा सुरू झाला आणि उपनयनाच्या विधीमध्ये पुरोहितपणा करण्याची पात्रता फक्त ब्राम्हण लोकांनाच प्राप्त झाली.

म्हणून एक गोष्ट ठाम झाली होती, हे धरून चालले पाहिजे. ती गोष्ट म्हणजे ब्राम्हणाशिवाय इतर कोणीही उपनयनविधी करू शकत नसत. कोणी तसा उपनयनविधी केला असता तर तो विधी शास्त्रशुद्ध समजला जात नसे;

कोणतेही धार्मिक स्वरूपाचे अनधिकृत कृत्य करावयाचे नाही, हा हिंदी-आर्य समाजाच्या धार्मिक पद्धतीतील दुसरा शासनदंडक होता. ब्राम्हणाने कर्तव्यकर्मे म्हणून याला विहित करण्यात आले होते. या कर्तव्यकर्माप्रमाणे ब्राम्हणाने जर वर्तन केले नाही तर त्याला शिक्षा भोगावी लागत असे किंवा प्रायश्चित्त घ्यावे लागत असे. अशा प्रकारच्या पुष्कळ शिक्षा प्राचीन काळच्या (धर्मशास्त्र) कायद्याच्या ग्रंथात मिळतात. मनू व पराशर यांचा येथे उल्लेख करणे आवश्यक आहे.

कोणत्या वर्गाचे ब्राम्हण देवांना पितरांना अर्घ्य देण्यास अपात्र समजले पाहिजेत, याबद्दल मनूने (३-१५० आणि पुढे) यादी दिली आहे. त्याने या यादीत खालील ब्राम्हणांचा समावेश केला आहे :-

३-१५६ 'जो ठराविक वेतन घेऊन शिकवितो, जो त्याच अटीवर शिक्षण घेतो,

जो शूद्र विद्यार्थ्यांना शिकवितो, ज्याचा शिक्षक शूद्र आहे, जो उन्मतपणे बोलतो, जो व्यभिचारी स्त्रीचा मुलगा आहे व जो विधवेचा मुलगा आहे.'

पराशर म्हणतो(Vyavahar mayukha edited by Kane p. 115):-

'जो ब्राम्हण दक्षिणा मिळण्याच्या आशेने शुद्राच्यातर्फे अग्नीमध्ये अर्ध्य अर्पण करतो, तो शूद्र होईल. ज्या शूद्रातर्फे तो ब्राम्हण अर्ध्य अर्पण करतो, तो शूद्र ब्राम्हण होईल. माधवांच्या मताप्रमाणे त्या विधीचे श्रेय शूद्रालाच जाते व पाप ब्राम्हणाला लागते.'

उपनयनाचा अधिकार शूद्रांकडून हिरावून घेण्याइतके ब्राम्हणांच्या हातात अधिकार होते काय ? असे जे विचारतील त्यांनी पुढील दोन गोष्टींचा संमिश्र परिणाम काय होतो, याचा विचार करावा :- (१) उपनयनाच्या वेळी ब्राम्हणांना पुरोहितपणा करण्याचा एकमेव अधिकार होता, आणि (२) अनिधिकृत उपनयन केले तर ब्राम्हणाला शिक्षा भोगाव्या लागत असत. उपनयन नाकारण्याचे अधिकार ब्राम्हणांना मिळाले; व उपनिर्दिष्ट दोन गोष्टींचाच हा संमिश्र परिणाम झाला, याबद्दल मुळीच संशय नाही. असल्या तऱ्हेचा अधिकार ब्राम्हणांना प्रत्यक्ष मिळाला नाही किंवा तो कोणी स्वखुषीने त्यांना दिला नाही. हे खरे आहे. परंतु असला अधिकार त्यांना अप्रत्यक्ष रीतीने पण जास्त परिणामकारक उपायांनी आपोआप हळूहळू मिळत गेला. म्हणून तो त्यांना कोणी राजरोसपणे देण्याची मुळीच जरूरी राहिली नाही. (वाढत्या बौद्धधर्माला आळा घालण्यासाठी व त्याचा पाडाव करण्यासाठी योजना आखण्याची वेळोवेळी गरज भासत होती, हे लक्षात असेल तर ही गोष्ट सुलभतेने समजते.)

उपनयन नाकारण्याची आपणास सत्ता आहे. याची ब्राम्हणांना जाणीव आहे. याबद्दल सुद्धा वाद नाही. या बाबतीत जे ऐतिहासिक कागदपत्र उपलब्ध आहेत त्यावरून असे दिसते की, अनेक जातीच्या विरूद्ध ब्राम्हणांनी या सत्तेचा उपयोग केला आहे त्यापैकी १६ खटले कोर्टात गेले. नऊ खटल्यांत ब्राम्हणांनी कायस्थांचे उपनयन करण्याचे नाकारले होते. एका खटल्यात ब्राम्हणांनी पळशे ब्राम्हणांचे उपनयन करण्याचे नाकारले होते. विशेष महत्वाचे हे की, ब्राम्हणांनी खुद्द दोन मराठे राजांचे उपनयन करण्याचे नाकारले होते. ही उदाहरणे इ.स. ५५६ ते १९०४ या अवधीत घडून आली आहेत. ही उदाहरणे पुरातन काळची नाहीत ही गोष्ट खरी. तथापि ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, ही उदाहरणे म्हणजे उपनयन नाकारण्याची ब्राम्हणांनी जी शिरजोरी केली तिचे पुरावे आहेत. ब्राम्हणांनी ही शक्ती फार पुरातन काळी कमवलेली असली पाहिजे. हे सामर्थ्य त्यांनी प्राचीन काळी कमावून घेतले असले पाहिजे. हे म्हणणे काही वावगे नाही त्याला आधार आहे. सत्यकाम जाबालीचे उदाहरण फारच प्राचीन काळचे आहे. एखाद्याचा वर्ण त्याच्या गुणावरून (मानसिक व नैतिक सद्गुण) ओळखता येतो, जन्मावरून नव्हे, हे दाखविण्यासाठी या उदाहरणाचा दाखला बहुधा घेतला जातो, ही गोष्ट खरी आहे. त्याचप्रमाणे जाबालीच्या उदाहरणावरून हेच सिद्ध होते की, फार प्राचीन काळीसुद्धा ब्राम्हणांनी उपनयन नाकारण्याचा अधिकार प्राप्त करून घेतला आहे.

आपल्या उद्दिष्टाला अनुरूप अशा बऱ्याच गोष्टी आत्तापर्यंत सांगितल्या. परंतु त्या गोष्टीवरून कोणते सारांश निघतात, याची जाणीव जर आपणाला होत नसेल तर त्या गोष्टीचा आपल्या उद्दीष्टाला काय उपयोग ? हे सारांश काढण्यासाठी प्रत्येक गोष्टीचा तपशील माहित करून घेतला पाहिजे. दुर्दैवाने बहुधा या सर्व गोष्टींचा शेवट माहित आहे. परंतु त्यांच्या तपशिलासंबंधी सविस्तर माहिती काढण्यास वाव राहत नाही. परंतु एक गोष्ट अशी आहे की, जिच्यासंबंधी तपशील परिपूर्ण आणि जगजाहीर आहे, ती गोष्ट म्हणजे शिवाजी विरूद्ध ब्राम्हण ही कहाणी फार महत्वाची आहे. म्हणून तिचे सविस्तर विवरण करणे योग्य आहे. तिच्यापासून जे सारांश निघतात, ते नुसते मनोरंजक आणि मार्गदर्शक नाहीत तर ते आपल्या विवाद्य मुद्द्यावर प्रकाशाचा झोत फेकतात.

हे सर्वांना माहित आहे की, महाराष्ट्राच्या पश्चिम भागात स्वतंत्र राज्य स्थापन केल्यानंतर शिवाजीने स्वत:चा राज्यभिषेक करून घेऊन स्वत:ला राजा म्हणून जाहीर करण्याचा विचार केला. राज्याभिषेकाचा विधी विशेष महत्वाचा हवा असल्यास तो वैदिक पद्धतीत केला पाहिजे. ही गोष्ट शिवाजी व त्याचे मित्र यांना पटली होती. परंतु आपली इच्छा सफळ करण्यात बऱ्याच अडचणी आहेत याची जाणीव शिवाजीला होती. आपला राज्याभिषेक वैदिक पद्धतीने केला जाईल किंवा नाही, ही बाब सर्वस्वी ब्राम्हणांच्या मर्जीवर अवलंबून आहे, याची त्याला खात्री होती. हा विधी धार्मिक दृष्टीने करण्याला ब्राम्हणांशिवाय असला विधी होणे शक्य नव्हते. दुसरे कारण असे की, तो स्वत: क्षत्रिय आहे हे सिद्ध करून दाखविल्याशिवाय असला विधी होणे शक्य नव्हते. तिसरी एक अडचण होती, ती ही की, तो क्षत्रिय आहे असे जरी मानण्यात आले तरी उपनयन करण्याचे त्याचे वय निघून गेले होते. उपनयनाशिवाय राज्याभिषेक होणे शक्य नव्हते. तिसरी अडचण सोपी होती. कारण ती व्रात्यस्तोम करून दूर करता येण्यासारखी होती. पहिली अडचण मात्र शिवाजीच्या मार्गातील मोठी धोंड होती. ती शिवाजीचा सामाजिक दर्जा दर्शवीत होती. तेव्हा जो प्रश्न उपस्थित झाला तो हा की, शिवाजी क्षत्रिय होता काय ? हा प्रश्न सोडविला तर बाकी सर्व प्रश्न सोपे आहेत. मी क्षत्रिय आहे, असे शिवाजीचे म्हणणे होते. याला पुष्कळांचा विरोध होता. त्याचे मुख्य विरोधी ब्राम्हण लोक होते. त्या ब्राम्हणांचा पुढारी शिवाजीचाच मुख्य प्रधान होता. शिवाजीच्या दुर्दैवाने त्यांचे मराठे सरदार त्याला आपल्यापेक्षा जास्त उच्च सामाजिक दर्जा द्यावयास तयार नव्हते, उलट अशी ते त्यांच्या क्षत्रियत्वाच्या हक्काचा विरोध करण्यासाठी त्यांच्या विरूद्ध एकजूट उभे राहिले. राज्याभिषेकाची कल्पना कशी उद्‌भुत झाली. यासंबंधी किनकेड याने काही मनोरंजक विचार प्रदर्शित केले आहेत. तो म्हणतो :-

'कारण, जरी अत्यंत बाणेदार दक्षिणी सरदार रणक्षेत्रात शिवाजीच्या खांद्याला खांदा लावून लढले तरी ते खाजगी आयुष्यात शिवाजीला आपल्यापेक्षा श्रेष्ठ मानावयास तयार नव्हते आणि जेव्हा दरबारी खाने होत त्यात भोसल्याचे ताट मोहिते, निंबाळकर, सावंत व घोरपडे यांच्या ताटाच्या आसनापेक्षा जास्त उंचीच्या आसनावर मांडलेले

असे. हे पाहून मोहिते, निंबाळकर, सावंत व घोरपडे याबद्दल नापसंती प्रदर्शित करीत. शिवाजीने आपल्या राज्यभिषेकासंबंधी आपला चिटणीस बाळाजी आवजी चिटणीस याच्याशी बोलणे काढले. तेव्हा चिटणीसाने त्याला आग्रह केला की, राजमुकुट घ्यावयाचा तर तो मोगल बादशहाच्या हातून न घेता काशीच्या पुरोहिताकडून घ्यावा. राजाने आपली माता जिजाबाई, साधू रामदास आणि आराध्य देवता भवानी यांचा सल्ला घेतला व त्या सर्वांनी चिटणीसाच्या म्हणण्याला दुजोरा दिला.' (History of Maharashtra p. 244.)

यावरून असे दिसते की, वैदिक राज्याभिशेकांच्या पाठीमागे जी कल्पना आहे, ती सामाजिक दर्जा प्राप्त करून घेण्यासाठी. कायदेशीर किंवा राजकीय राजेशाही मिळण्यासाठी नाही.

त्यांच्या मते तो शूद्र होता, आपण क्षत्रिय आहोत, हे शिवाजीचे म्हणणे. कलियुगात क्षत्रिय नाहीत. हा ब्राम्हणांनी प्राचीन काळापासून रूढ केलेला जो सिद्धांत आहे त्याच्याविरूद्ध जाणारे होते. शिवाजी कलियुगात राहत होता. आर्थात तो क्षत्रिय असणे शक्य नव्हते. क्षत्रियत्वाच्या विरूध्द असणारा हा आरोप पुढील गोष्टीमुळे द्विगुणित होतो. त्याने योग्य वयात उपनयन विधी केला नव्हता. शास्त्राप्रमाणे क्षत्रियाने ११ व्या वर्षी हा विधी केला पाहिजे. हा विधी करण्याचे त्याचे वय निघून गेले होते. त्याचा हा विधी झाला नव्हता. हा पुरावा त्याचे विरूध्द आहे असे मानण्यात आले. तथापि त्याच्या सुदैवाने त्याला गागा भटाची मदत मिळाली. गागा भट हा बनारसचा (काशीचा) रहिवाशी, प्रसिध्द ब्राह्मण, वेद व शास्त्रे यात पारंगत असा होता. गागा भटाने सर्व अडचणी दूर करून तरीख ६ जून १६७४ रोजी रायगड येथे शिवाजीचा राज्याभिषेक केला. प्रथम त्याने शिवाजीचा व्रास्त्यस्तोम केला व नंतर उपनयन केले. त्यानंतर राज्याभिषेक विधी केला. शूद्र राजाचा राज्याभिषेक अवैदिक पध्दतीने म्हणजे पुराणातील विधी करून करण्याची पध्दत होती. या पध्दतीप्रमाणे शिवाजीचा राज्याभिषेक करण्यास काही ब्राह्मण तयार होते, असे दिसते. वैदिक पध्दतीने शिवाजीने आपला राज्याभिषेक करवून घेतला, तर कोणत्या प्रकारचे घोर अनर्थ प्राप्त होती, याबद्दलचे भविष्य वर्तविण्यासही त्यांना काही वाटले नाही. दुदैवाने हे अनर्थ घडले; आणि शिवाजी ज्योतिष शकुनावर, धर्मसमजुतीवर नितांत विश्वास ठेवणारा असल्यामुळे त्याने आपला दुसरा राज्याभिषेक अवैदिक पध्दतीने करून घेतला. या राज्याभिषेकाचा पुढील मनोरंजक वृत्तांत श्री. चिंतामणराव वि. वैद्य यांच्या (Shivaji the Founder of Maratha Swaraj, pp. 252-253) या ग्रंथातून घेतला आहे. :-

निरर्थक अडथळे उत्पन्न करणारे आणि समाधान न मानणारे नेहमीप्रमाणे तेव्हाही ब्राह्मण होते. हा विधी साऱ्या महाराष्ट्राला आवडला. तरी त्या ब्राह्मणांना तो समाधानकारक वाटला नाही. कोण्या एका कवीने या समारंभासंबंधी राज्याभिषेक कल्पतरू या नावाचे काव्य लिहीले होते. त्या काव्याची एक प्रत बेंगॉल रॉयल एसियाटिक सोसायटीच्या लायब्ररीत होती. त्या प्रतीवरून ते काव्य पुण्याच्या इतिहास संशोधक

मंडळाने आपल्या त्रैमासिकात (Vol.xoi) छापले होते. या राज्याभिषेकाविधीच्या विरूध्द असलेले काही आक्षेप या काव्यात ग्रंथित केले होते, शिवभारत या कवीने शिवाजीला विष्णूचा अवतार मानून त्यांच्यावर कविता फार पूर्वी केल्या होत्या. राज्याभिषेक कल्पतरू या काव्यात शिवाजीला शिवाचा अवतार मानले आहे. शिवाजी शिवाचा अवतार ही कल्पना राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत लोकप्रिय झाली होती. यावरून असे दिसते की, शिवाजीचा दुसरा राज्याभिषेक झाल्यानंतर थोड्याच काळात राज्याभिषेक कल्पतरू हे काव्य लिहिण्यात आले होते. तर शिवभारत हे राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत लिहिले गेले असले पाहिजे. काशीचा विद्वान ब्राह्मण यती आणि गागा भटाचा विरोधी विश्चलपुरी याचे आणि गोविंदभट बर्वे यांचे कोकणामध्ये संभाषण चालले आहे, अशी कल्पना काव्यात मांडली आहे. शिवाजीच्या दुसऱ्या राज्याभिषेकाच्या अगोदर तसेच नंतर कोणते अपशकुन, अपघात झाले याची माहिती निश्चलपुरी व बर्वे संभाषणाच्या द्वारे या काव्यात दिली आहे. उदाहरणार्थ, प्रतापराव गुजर यांचा मृत्यु. शिवाजीची पत्नी काशीबाई हिचा मृत्यू. मंडपाचा वासा पडून खुद्द गागा भट याच्या निकाला झालेली जखम वगैरे. जे ब्राम्हण गागा भटाचे वर्चस्व मान्य करीत होते तेवढ्यांनाच राज्याभिषेक विधीमध्ये गागा भटाने कामाला लावले आणि ज्या ब्राम्हणांना कामाला लावा अशी निश्चलपुरीने शिफारस केली त्या ब्राम्हणांना कामावर ठेवण्याचे गागा भटाने साफ नाकारले, असा या काव्यात केला आहे. उदाहरणार्थ सिंहासनावर बसण्याचा विधी संपल्यानंतर रथात बसण्याचा विधी व्हावयाचा होता. शिवाजी रथात चढण्याच्या अगोदर गागा भट रथात चढला व बसला; त्यानंतर शिवाजी रथात चढला व बसला. निश्चलपुरीने राज्याभिषेकाचा विधी सुरूवातीपासून शेवटपर्यंत पाहिला व नंतर तो रायगड सोडून गेला. परंतु जाण्यापूर्वी त्याने शिवाजीला असे सांगितले की, १३ व्या, २२ व्या आणि ५५ व्या दिवशी काही अशुभ गोष्टी घडतील. निश्चलपुरीच्या भविष्याप्रमाणे १३ व्या दिवशी शिवाजीची मातोश्री वारली. त्यानंतर प्रतापगडावर घोड्यांची पागा जळाली व बरेच घोडे जळून मेले. सिंहगडावर हत्ती मेला. या अशुभ घटना पाहून त्याचा निश्चलपुरीवर विश्वास बसला. त्याने त्याला व ब्राम्हण अनुयायांना बोलावून आणले आणि त्यांच्या सहाय्याने पुन: दुसरा राज्याभिषेक करून घेतला. यापैकी वैदिक विधी वापरले नव्हते. तर तांत्रिक म्हणजे जादुटोण्याचे विधी वापरले. या समारंभाचे सुद्धा सविस्तर वर्णन सदर काव्यात दिले आहे. सामवेदातील काही मंत्र या काव्यात दिले आहेत. परंतु या समारंभाचा एकंदर विधी वैदिक नव्हता. हा समारंभ अश्विन शुद्ध पंचमीला (ललित पंचमी सवंत १५९६) झाला, असे या काव्यात म्हटले आहे. या समारंभाचा उल्लेख यदुनाथ सरकार यांनीही केला आहे. निश्चलपुरी याचे नाव मुसलमानी ऐतिहासिक कागदपत्रात सापडते.

शिवाजीचे उदाहरण अनेक कारणांसाठी महत्वाचे आहे. ब्राम्हणाशिवाय इतर कोणालाही उपनयन करण्याचा हक्क नाही आणि ब्राम्हणावर एखाद्याचे उपनयन करण्याची

सक्ती करण्याची शक्ती कोणाला नाही. या गोष्टी शिवाजीच्या उदाहरणावरून सिद्ध झाल्या आहेत. म्हणून ते उदाहरण महत्वाचे आहे. शिवाजी एक स्वतंत्र राज्याचा राज्यकर्ता होता त्याने स्वतःला महाराजा व छत्रपती हे किताब घेतले होते. तरीसुद्धा आपला राज्याभिषेकविधी करवून घेण्याच्या बाबतीत शिवाजीला एकाही ब्राम्हणावर सत्ता गाजविता आली नाही.

राज्याभिषेकाचा विधी कायदेशीर ठरवायचा असेल तर तो ब्राम्हणांच्याचा हातून झाला पाहिजे, ही गोष्ट शिवाजीच्या उदाहरणावरून सिद्ध झाली आहे. म्हणून हे उदाहरण महत्वाचे आहे. राज्याभिषेकाचा विधी जर ब्राम्हणेतराच्या हातून करण्यात आला तर तो विधी सफळ होत नसतो म्हणजे तो वांझ ठरतो. ब्राम्हणेत्तरांच्या हातून विधी उरकून घेण्याचा मार्ग शिवाजीच्यापुढे होता. परंतु तो मार्ग चोखाळण्याची त्याची छाती नव्हती. (कायस्थांचा सामाजिक दर्जा हिंदू समाजात उच्च आहे. असा पक्ष जेव्हा कायस्थानी मांडला तेव्हा ब्राम्हणांनी त्यांना विरोध केला. ब्राम्हणांच्या या वृत्तीबद्दल धिःकार प्रदर्शित करण्यासाठी कायस्थांनी ब्राम्हणांवर बहिष्कार व आपल्या जातीचे सर्व धार्मिक विधी कायस्थातील लोकच करतील, अशी घोषणा जाहीर केली. परंतु ही घोषणा कायस्थांनी अंमलात आणली नाही याचे कारण तेच असावे.) कारण शिवाजी राजे जाणून होते की, ब्राम्हणेतरांकडून जर हा विधी केला तर त्या विधीपासून सामाजिक किंवा आध्यात्मिक इष्ट फळ प्राप्त होणार नाही.

तिसरे कारण असे की, एखाद्या हिंदूचा दर्जा कोणता आहे, हे ठरविण्याचा सर्वाधिकार सर्वस्वी ब्राम्हणांचा आहे. ही गोष्ट शिवाजीच्या उदाहरणावरून सिद्ध होते, म्हणून ते उदाहरण महत्वाचे आहे. मारवाड्याचे सिसोदिया हे क्षत्रिय समजले जात होते. शिवाजीचा मित्र बाळाजी आवजी याने मारवाड्याच्या सिसोदिया घराण्याची वंशावळ मिळवून असे सिद्ध करून दाखविले की, शिवाजीच्या पूर्वजांचा या घराण्याशी धागादोरा लागतो व म्हणून शिवाजी क्षत्रिय ठरतो. या बाबतीत असे म्हणण्यात येते की, केवळ शिवाजीचा राज्याभिषेक निर्विघ्नपणे पार पाडावा म्हणून ही बनावट वंशावळ आणली. तयार करून आणलेली वंशावळ बनावट नव्हती, असे समजले तरी त्यावेळी शिवाजीचा क्षत्रियत्वाचा हक्क कसा सिद्ध केला जातो? मेवाडचे सिसोदिया कुळ दोन्ही कारणांनी महत्वाचे होते. (१) नारायणाचा नायक, त्याचा वडिल पुत्र लव आणि लवाच्या कुळात जन्मले ते उदेपूरचे सिसोदिया. मेवाडचे सिसोदिया हे उदेपूरच्या सिसोदियाची एक शाखा. (२) मेवाडच्या सिसोदियाने आपल्या कुळात रक्तशुद्धी ठेवली होती. कारण त्यांनी आपल्या घराण्यातील स्त्रियांना मोगल बादशहांना देण्याचे नाकारले होते. जयपूर व जोधपूर येथील रजपूत कुटूंबांनी आपल्या घरातील स्त्रिया मोगल बादशहांना दिल्या होत्या, म्हंणून अशा रजपूत घराण्याशी बेटी व्यवहार करण्याचे मवाडच्या सिसोदियांनी नाकारले होते. शिवाजी सिसोदिया घराण्यातील वंशज आहे हे सिद्ध करण्याचा खटाटोप करण्यात आला तो याच एका गोष्टीमुळे काय ? या वंशावळीमुळे शिवाजी क्षत्रिय होते

काय, हा नसता प्रश्न या वंशावळीमुळे उपस्थित झाला. सिसोदिया हे क्षत्रिय होते काय, हा नसता प्रश्न या वंशावळीमुळे उपस्थित झाला. सिसोदिया रजपूत होते प्राचीन काळची जी आर्य जमात होती तीमध्ये दुसऱ्या वर्णाचे क्षत्रिय होते. रजपूत हे या प्रारंभीच्या क्षत्रीयांचे वंशज आहेत की काय, याबद्दल जबरदस्त शंका आहे. हूण या परकीय लोकांनी हिंदूस्थानावर स्वारी केली व त्यातील बरेच लोक राजपुतान्यामध्ये स्थायिक झाले. त्यावेळी हिंदुस्थानात बौद्ध धर्माची चांगली चलती चालली होती. त्या धर्माचा मध्य हिंदुस्थानात पाडाव करण्यासाठी ब्राम्हणांनी या हूण लोकांना हाती धरले. पवित्र अग्नीसमोर काही विशिष्ट विधी करून ब्राम्हणांनी या हूण लोकांना क्षत्रियाचा दर्जा दिला म्हणून ते अग्निकुल क्षत्रिय या नावाने ओळखले जातात. हूण लोक क्षत्रिय झाल्यानंतर त्यांनी ब्राम्हण धर्माच्या संरक्षणार्थ तरवार उपसली व ती बौद्ध धर्मानुयायांची मुंडकी तोडण्यासाठी वापरली. याप्रमाणे ब्राम्हणांनी रजपुतांच्या करवी बौद्ध धर्म रसातळाला नेला. म्हणजे, रजपूत हे हूण लोकांचे वंशज म्हणजे परदेशी लोक होत. वरील मत काही विद्वानांचे आहे. या विषयावर अधिकार वाणीने बोलण्याची ज्यांची शक्ती आहे अशा बऱ्याच महापंडितांचा वरील मताला दुजोरा आहे. या बाबतीत व्हिसेंट म्हणतो.(C.V. Vaidya, History of Mediaeval India Vol. 11, p.8)

या ठिकाणी ज्या एका गोष्टीकडे मी लक्ष वेधू इच्छितो ती गोष्ट ही की, राजपुतान्यात आणि गंगेच्या वरच्या भागात परकीय लोक आले व त्यांनी एतद्देशीय राजे लोकांशी निकराचे झगडे केले. हे परकीय लोक म्हणजे हूण होत. एतद्देशीय राजांनी या परक्या लोकांची पूर्णपणे कत्तल करून त्यांना नामशेष केले होते की काय, याबद्दल पुष्कळ काळ शंका होती. परंतु या बाबतीत भरपूर पुरावे उपलब्ध झाले आहेत व त्या पुराव्यांवरून आता असे सिद्ध झाले की, हे परकीय लोक या झगड्यामध्ये नामशेष झाले नव्हते. अर्थात या परक्या लोकांपैकी बरेच लोक या युद्धात नष्ट झाले होते. परंतु त्यांच्यापैकी बरेच लोक वाचले होते. या युद्धातून जिवंत सुटलेले परके लोक राजपुतान्याची सर्वसाधारण जी लोकसंख्या आहे तिचा बराचसा भाग या परक्या लोकांच्या वंशजांचा आहे. हूण लोकांच्या अगोदर शक आणि यूची लोक हिंदुस्थानात आले होते. शकांनी एतद्देशीयांशी लढाया केल्या आणि शेवटी हिंदू धर्माच्या श्विव्यापक स्वरूपाने आणि दिव्य प्रभावाने दीपून जाऊन त्यांनी हिंदू धर्माचा स्वीकार केला, आणि ते अल्प काळातच हिंदूमय झाले. हूण लोकांची अशीच अवस्था झाली. राजपुतान्यात स्थायिक झाल्यानंतर त्यांनी हिंदू धर्म स्वीकारला व अगदी थोड्या काळात ते सुद्धा हिंदुमय झाले. ज्या जमातीच्या किंवा कुळांच्या लोकांची राज्ये स्थापन केली त्या लोकांना ब्राम्हणांनी हिंदू धर्मात सहजासहजी घेतले व त्यांना क्षत्रिय किंवा राजपूत हे नाव दिले. परझार आणि उत्तरेकडील दुसऱ्या पुष्कळ रजपूत जमाती यांची उत्पत्ती पाचव्या व सहाव्या शतकात हिंदुस्थानात टोळ्या टोळ्यांनी प्रवेश करणाऱ्या रानटी लोकांपासून झाली असावी, याबद्दल संदेह नाही. या परकीय लोकांबरोबर जे सामान्य प्रतीचे लोक हिंदुस्थानात आले होते ते पुढे गुजर या

नावाने मिरवू लागले. यांचा सामाजिक दर्जा रजपुतांच्या खालचा ठेवण्यात आला. दक्षिणेच्या बाजूला सुद्धा असलीच परिस्थिती आढळून येते. या प्रदेशात पुष्कळ रानटी व डोंगराळ भागात टोळ्या होत्या. ब्राम्हणांनी त्यांना हिंदू धर्माची दीक्षा देऊन त्यांचा सामाजिक दर्जा उंचावून ठेवला. हिंदू धर्म स्वीकारलयानंतर गोंड लोकांना चंडेल, बहार लोकांना राठोर व खाखा लोकांना गहरवार अशी नावे ब्राम्हणांनी दिली. अशा रानटी टोळ्याचे आणि इतर प्रसिद्ध रजपूत जमातीचे स्थित्यंतर ब्राम्हणांनी केले. कोणाचा मूळपुरूष सूर्य तर कोणाचा मूळपुरूष चंद्र असेही ब्राम्हणांनी त्या सर्व रानटी टोळ्यांना व रजपूत जमातींना सांगून ठेवले.'

या बाबतीत वुइल्यम कुक म्हणतो (Vaidya, History of Mediaeval India, Vol, II. P. 8) :-

'अलीकडच्या काळात जे संशोधन करण्यात आले आहे, त्यामुळे बरीच माहिती हातात आली आहे. ही माहीती रजपुतांच्या उत्पत्तीवर पुष्कळ प्रकाश टाकते. वैदिक क्षत्रिय आणि मध्य युगातील रजपुत यांच्यामध्ये जमीन - अस्मानचा फरक आहे; आणि हा फरक नाहीसा करणे आता अशक्य झाले आहे. आत एवढी गोष्ट खरी की, राजपुतांच्या बऱ्याच जमातींची उत्पत्ती ज्यांनी हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या त्या शक किंवा हूण लोकांपासून, अथवा यापेक्षाही काटेकोरपणाने सांगावयाचे तर ज्यांनी इ.स. ४८० च्या सुमारास गुप्ताचे साम्राज्य धुळीस मिळविले तया श्वेत हूण लोकांपासून झाली. गुर्जर नावाची टोळी पुढील काळातील लोकांशी निगडित झाली. तिने हिंदू धर्म स्वीकारला. त्या टोळीचे जे प्रमुख पुढारी होते, ते या टोळीचे आधारस्तंभ होते. त्यांच्यापासून पुढे वरिष्ठ दर्जाची रजपुत घराणी उत्पन्न झाली. या घराण्यांना राज्यपदाचे अधिकार नविन मिळाल्यामुळे या घराण्यातील लोकांनी हिंदू धर्माचा स्वीकार केला व ब्राम्हणांचे धार्मिक वर्चस्व मान्य केले. या कारणांनी या घराण्यातील थोर पुरूषांच्या वंशाचा संबंध महाभारत व रामायण यातील नायकांशी साहजिकच भिडविण्याचा प्रयत्न करण्यात आला. या रजपुत घराण्यांपैकी काही घराण्यांची उत्पत्ती सूर्यापासून झाली व काही घराण्याची उत्पत्ती चंद्रापासून झाली. अशा अद्भूत रम्य कल्पना ब्राम्हणांनी ग्रंथामध्ये रचल्या. यामुळे या ग्रंथात रजपूतांसंबंधी अनेक दंतकथा पाहावयास मिळतात. खत्रिय किंवा रजपूत या नावाने ओळखली जाणारी जी जमात होती, तिने लढाया जिंकून आपला दरारा बसविला होता व ती आपल्या सामाजिक दर्जाला जास्त महत्व देत होती. या काळात जातिबंधने फारशी पाळली जात नसत. अशा परिस्थितीत परकीय देशातून येऊन येथे कायमची वसती करून राहिलेल्या लोकांना अशा टोळ्यांमध्ये(क्षत्रिय किंवा रजपूत म्हणून) सहजपणे ढकलणे ब्राम्हणांना शक्य होते. परंतु परकीय लोकांचा हा टोळ्यांमधील प्रवेश योग्य ती युक्ती योजून लपविणे ब्राम्हणांना भाग पडले. या बाबतीत ब्राम्हणांनी अशा कपोलकल्पित कथा रचल्या की, बुद्ध धर्माचा व इतर पाखंडी मताचा जगात फार बुजबुजाट झाला व त्यामुळे पाप फार वाढले. म्हणून परमेश्वराने ब्राम्हणांना साहाय्य करण्यासाठी

परमेश्वराने प्राचीन वैदिक ऋषींच्या नेतृत्वाखाली शुद्धीच्या गंभीर विधीने किंवा दिक्षेने काही लोक अग्नीतून उत्पन्न केले. ही अद्‌भूतरम्य कथा परमार, परिहार, चालुक्य व चव्हान या ज्या चार जमाती कुल म्हणून मानल्या जातात त्यांच्या उत्पत्तीसभोवती गुंफल्या आहेत'

डॉ. डी.आर. भांडारकर यांचेसुद्धा असेच मत आहे त्यांच्यामते रजपूत हे गुजर लोंकांचे वंशज आहेत. गुजर हे परक्या देशातून येऊन येथे राहिलेले लोक आहेत. म्हणून रजपूत हे परकीय लोकांचे वंशज ठरतात. (Mr. Vaidya, History of Mediaeval India, P. 10) वैद्य हे या मताला विरोध करतात. रजपूत हे परके नाहीत तर ते अगदी प्रारंभीच्या आर्य-क्षत्रियांचे वंशज आहेत. असे सिद्ध करण्याचा श्री. वैद्य यांनी प्रयत्न केला आहे.

शिवाजीच्या राज्याभिषेक विधीच्या वेळी ज्या ब्राम्हणांना कामावर लावले होते, त्यांना रजपुतांची उत्पत्ती कशी झाली होती व रजपूत लोक आपण क्षत्रियांचे वंशज आहोत असे जे म्हणतात त्यात कितपत तथ्य आहे, या गोष्टीबद्दल माहिती असली पाहिजे. परंतु असली माहिती नव्हती असे मानले तरी कलियुगात क्षत्रिय नाहीत, हा ब्राम्हणांनी जो निर्णय दिला होता, त्याबद्दल त्यांना माहिती असलीच पाहिजे. हा निर्णय फार जुन्या काळचा असून तो वंशपरंपरेने सर्वांना माहीत झाला होता. पूर्वपरंपरेला आदर द्यावयाचे जर ब्राम्हणांच्या मनात असते तर आपण क्षत्रिय आहोत अशी घोषणा सिसोदिया त्याप्रमाणे शिवाजीने जेव्हा केली तेव्हाच ती ब्राम्हणांनी त्याज्य मानावयास हवी होती. ब्राम्हणांनी असे केले असते तर त्यांना कोणी दोष दिला नसता. परंतु परंपरा ब्राम्हणांना बंधनकारक आहे, असे त्यांनी कधीच मान्य केले नाही.

शिवाजीचे उदाहरण महत्वाचे आहे. याचे चवथे कारण असे की, सामाजिक दर्जा ठरविण्याच्या बाबतीत जे निर्णय देत असत, ते कोणत्या पक्षकडून किती पैसा मिळेल याकडे दृष्टी ठेऊन कमी-जास्त अनुकूल निर्णय देत असत. रोमन कॅथोलिक पंथातील पाद्री लोक, लोकांच्याकडून पैसे घेऊन त्यांच्या पापांचे क्षालन करत असत. त्याचप्रमाणे ब्राम्हण लोक आपले निर्णय विकीत असत. शिवाजी क्षत्रिय होता, असा जो निणय गागा भट्टाने दिला होता तो प्रामाणिकपणे दिलेला निर्णय नव्हता. शिवाजीच्या राज्याभिषेकविधीच्या प्रसंगी पुरोहितपणा करण्यासाठी म्हणून गागा भट्ट आणि त्याच्या बाजूचे ब्राम्हण यांना जी रक्कम शिवाजीने दिली होती ती रक्कम लक्षात घेतली तर तो निर्णय प्रामाणिकपणे दिला नव्हता हा मुद्दा स्पष्ट होतो. शिवाजीच्या राज्याभिषेक विधीसाठी किती पैसा खर्च झाला व त्यापैकी गागा भट्ट व त्याचे ब्राम्हण यांच्या हातात किती गेला, याची तपशीलवार माहिती श्री. वैद्य यांनी गोळा केली आहे. ती खालीलप्रमाणे आहे. (Shivaji, the Founder Maharashtra Swaraj, pp.248 and 252) :-

या प्रधानांपैकी प्रत्येकाला एक लक्ष होन, एक घोडा, कपडे व दागिने यांचा नजराणा देण्यात आला. समारंभाच्या निरनिराळ्या वेळी त्या त्या वेळच्या योग्यतेप्रमाणे

शिवाजीने ब्राम्हणांना दक्षिणा दिल्या. सभासदाने असे लिहून ठेवले आहे की, समारंभाच एकंदर खर्च एक कोटी बेच्याळीस लक्ष होन अथवा ४२६ लक्ष रूपये झाला होता. सभासद असे म्हणतो की, शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या समारंभाला ५०,००० वैदिक ब्राम्हण उपस्थित झाले होते. (श्री. वैद्य म्हणतात की, ५०,००० हा आकडा ५,०० या आकड्याऐवजी चुकून पडला असावा. परंतु या बाबतीत त्यांना काही साधकबाधक पुरावा पुढे ठेवता आला नाही.) याशिवाय जोगी, सन्याशी वगैरे हजारोंच्या संख्येने हजर राहिले होते. या लोकांना किल्ल्यांच्या खाली जेवू घालण्यात आले. काहींना शिधा देण्यात आला. त्यावेळच्या कागदोपत्री असा उल्लेख सापडतो की, राज्याभिषेक करण्याच्या अगोदर शिवाजीची सोन्यानी आणि इतर सर्व धातूंनी त्याचप्रमाणे शुभ्र वस्तुंनी तुला केली होती. डच लेखकांनी समारंभाचे सविस्तर वर्णन केले आहे. ते लेखक म्हणतात की, ही समारंभ ३ ऑक्टोबर पी.एस. १६८४ रोजी झाला; शिवाजीचे वजन १७,००० होन किंवा १६० पौंड झाले. रूपे, तांबे, लोखंड वगैरे धातू आणि कापूर, मीठ, साखर, लोणी, निरनिराळ्या प्रकारची फळे, सुपारी वगैरे वस्तुंच्या बरोबर तोलण्यात आले व त्या सर्व धातूंची व वस्तूंची जी किंमत झाली तेवढी रक्कम ब्राम्हणांना दक्षिणा म्हणून वाटण्यात आली. ७ जून म्हणजे राज्याभिशेकविधी झाल्यानंतरच्या दुसऱ्या दिवशी सर्वसामान्य ब्राम्हणांना दक्षिणा देण्यात आली. तेव्हा प्रत्येक ब्राम्हणाला तीन ते पाच रूपये मिळाले आणि बाकीच्यांना, स्त्रिया आणि लहान मुले यांना अनुक्रमे दोन रूपये व एक रूपया अशी दक्षिणा मिळाली. एकंदर जी दक्षिणा वाटण्यात आली. तीची किंमत दीड लक्ष होन (एक होन म्हणजे तीन रूपये) झाली होती.

१३ मे ते १३ जून या काळात ऑक्झेन्डेन यांनी जी आपली रोजनिशी लिहिली होती, तीत तो सुद्धा असे म्हणतो की, शिवाजीचे सोन्याबरोबर वजन केले तेव्हा ते वजन १६,००० होनाचे झाले; हे १६,००० व दुसरे एक लक्ष होन यांची दक्षिणा ब्राम्हणांमध्ये वाटण्यात आली.

ऑक्झेन्डेन पुढे लिहितो की, व्रात्यस्तोमाचा विधी करण्यासाठी गागा भटाला ७,००० होन आणि त्यांच्या बाजूच्या ब्राम्हणांना १७,००० देण्यात आले. ५ जूनला शिवाजीने पवित्र गंगेच्या पाण्याची आंघोळ केली. तेव्हा जे ब्राम्हण आंघोळीच्या ठीकाणी हजर होते, त्यांना प्रत्येकी १०० होन देण्यात आले.'

गागा भटाला जी रक्कम देण्यात आली होती, ती रक्कम म्हणजे पुरोहिताला देण्याला योग्य अशी दक्षिणा होती, यापेक्षा त्या रकमेला दुसरा अर्थ नाही असे होते काय ? दुसरा एक मुद्दा असा की, ज्याच्या आधारावर असाही अर्थ काढता येईल की, गागा भटाला पाहिजे तितका पैसा दिला नव्हता. तो मुद्दा हा की, शिवाजीच्या प्रधानांना जी रक्कम मिळाली, तिच्या मानाने गागा भटाला मिळालेली रक्कम फार कमी होती. या गोष्टीपासून सारांश काढण्याच्या अगोदर दुसऱ्या दोन गोष्टींचे महत्व विरूद्ध बाजूच्या दृष्टीने काय होते, हे समजावून घेतले पाहिजे.

त्या दोन गोष्टी गागा भटाला रक्कम कमी मिळाली होती, या म्हणण्याची सत्यता खोटी ठरवितात. त्या दोन गोष्टींपैकी एक गोष्ट ही की, प्रधानांनी स्वत: राज्याभिषेकाच्या वेळी शिवाजीला नजराणे दिले होते.(Vaidya, Shivaji the Founder of Maratha Swaraj, p. 247) शिवाजीचा पेशवा किंवा मुख्य प्रधान मोरोपंत पिंगळे याने ७,००० होन, आणि दुसरे दोन प्रधान यांनी प्रत्येकी ५,००० होन शिवाजीला नजर केले होते. शिवाजीने यांना ज्या रक्कमा नजर केल्या होत्या त्यातून वरील रकमा वजा केल्या तर प्रधानांच्या हाती शिवाजीकडून मिळालेलया ज्या रकमा शिल्लक राहतात, त्या बऱ्याच अल्प असाव्यात.

दुसरी गोष्ट ही की, शिवाजीचे हे प्रधान त्याच्या राज्याभिषेकाला कसून विरोध करणारे होते. शिवाजी शूद्र आहे आणि म्हणून त्याला राज्याभिषेक करून घेण्याचा अधिकार नाही; कारण हा अधिकार फक्त क्षत्रियांचा आहे, अशी त्या प्रधानांची ठाम समजूत झाली होती. त्यांचा विरोध बंद करण्यासाठी आणि त्यांना आपल्या बाजूचे कायमचे करण्यासाठी शिवाजीने त्या प्रधानांना मोठमोठे नजराणे दिले, यात आश्चर्य काही नाही. म्हणून शिवाजीने प्रधानांना जी रक्कम दिली तिचा गागा भटाला दिलेल्या रकमेची तुलना करणे योग्य ठरत नाही. त्याचप्रमाणे गागा भटाला दिलेली रक्कम ही त्याच्या पुरोहितपणाची अपुरी दक्षिणा होती, असाही सारांश वरील गोष्टीवरून काढणे योग्य ठरत नाही. खरोखर, शिवाजीच्या राज्याभिषेकाला संमती देण्याच्या अगोदर गागा भटाने इतके आढेवेढे घेतले होते की, त्याला जी रक्कम शिवाजीने दिली होती तीत त्याच्या पुरोहितपणाची दक्षिणा म्हणून एक रक्कम होतीच; परंतु गागा भटाची संमती मिळविण्यासाठी त्याला जी लाच शिवाजीने दिली होती त्या रकमेचाही तीत समावेश होत होता, असा कोणीही निष्कर्ष काढील.

या राज्याभिषेकाच्या बाबतीत प्रारंभापासून शेवटपर्यंत ज्याने प्रामुख्याने भाग घेतला व तो समारंभ साजरा करून दाखविला तो गृहस्थ महाराष्ट्राचा कायस्थ बाळाजी आवजी हा होता. हा गृहस्थ शिवाजीचा खाजगी चिटणीस होता. त्याने पहिले काम असे केले की, त्याने काशीहून गागा भटाला आणण्यासाठी १) केशव भट, २) भालचंद्र भट, ३) सोमनाथ भट हे तीन ब्राम्हण काशीला पाठविले. शिवाजीच्या एकंदर घराण्याची व पुढे होणाऱ्या राज्याभिषेकाची संपूर्ण रूपरेषा या ब्राम्हणाजवळ गागा भटाला पाठविण्यात आली होती. गागा भटाने काय केले ? शिवाजी हा शूद्र आहे म्हणून तो राज्याभिषेकाला पात्र नाही आणि म्हणून त्याचे आमंत्रण स्वीकारण्यास आपण तयार नाही, अशा अर्थाने पत्र लिहून ते पत्र तया तीन ब्राम्हण दूतांच्या स्वाधीन करून गागा भटाने त्यांना काशीहून परत पाठविले. यानंतर जे दुसरे कृत्य बाळाजीने केले ते शिवाजी क्षत्रिय आहेत, हे सिद्ध करणारे पुरावे गोळा करणे. एक वंशावळ मिळविण्यात बाळाजीला यश आले. मेवाडचे राज्यकर्ते सिसोदिया रजपुत यांच्या वंशजापासून शिवाजीचे वंशज जन्मले आहे, म्हणून शिवाजी क्षत्रिय ठरतो, असे त्या वंशावळीवरून सिद्ध होत होते. बाळाजीने ही वंशावळ

दुसऱ्या दुताबरोबर गागा भटाकडे पाठवून दिली. (या दूताचे नाव निळो येसाजी होते तो कायस्थ होता. गागा भआला काशीहून आणण्यासाठी प्रथम जे तीन ब्राम्हण पाठविण्यात आले होते, त्यांना ज्याप्रमाणे सुचना दिल्या होत्या त्याप्रमाणे त्यांनी काही केले नव्हते; ब्राम्हण असल्यामुळे त्यांना शिवाजीच्या हिताची गोष्ट पटत नसे. त्यामुळे त्यांनी काही तरी कपट नाटक तयार करून शिवाजीच्या हितावर अग्नी ठेवला असावा, अशी पुढे शंका घेण्यात आली. काशीहून त्या तीन ब्राम्हणांनी गागा भटाचे म्हणून जे पत्र आणले होते ते गागा भटाला भलत्या सलत्या गोष्टी सांगून लिहवून आणलेले असावे, असे बाळाजीला वाटले असेल हे शक्य आहे. म्हणूनच बाळाजीने यावेळी आपला कायस्थ जातीचा एक माणूस गागा भटाकडे पाठविला) हा वंशावळीचा पुरावा पाहून गागा भटाची खात्री झाली की शिवाजी क्षत्रिय आहे. कारण तो शिवाजीचा राज्याभिषेक विधी करण्यासाठी रायगडला यावयास तयार झाला. आल्यानंतर गागा भटाने काय केले ? मी वंशावळीच्या पुराव्याची कसून पाहणी केल्यानंतर असा सारांश काढला की, शिवाजी शूद्र आहे आणि म्हणून राज्याभिषेक करून घेण्यास तो अपात्र आहे, असे तो म्हणाला.

या बाबतीत ही एवढीच कोलांटी उडी गागा भटाने मारली नाही. या गोष्टीला गागा भटाने अशी काही चमत्कारिक कलाटणी दिली की, सांगता सोय नाही. ही त्याची दुसरी कोलांटी उडी होय, बाळाजी आवजी हा कायस्थ आहे म्हणजे तो क्षत्रिय आहे. म्हणून त्याचा राज्याभिषेक विधी करावयास आपण तयार आहोत, पण शिवाजीचा राज्याभिषेक विधी करावयास आपण मुळीच तयार नाही, कारण तो शूद्र आहे. असे गागाभटाने आपले मत प्रदर्शित केले. एवढेच करून गागा भट थांबला नाही. पुन: त्याने आपली पगडी फिरविली व असे मत सांगितले की, शिवाजी हा क्षत्रिय आहे व त्याचा राज्याभिषेक करावयास आपण तयार आहोत. या बाबतीत त्याची मजल इथपर्यंत गेली की, कायस्थ हे अकरमारे आहेत हे सिद्ध करण्यासाठी त्याने एक प्रबंध लिहिण्याचा खटाटोप केला. हा प्रबंध गागाभट्टी नावाने ओळखला जातो.

गागा भटाने वेळोवेळी सरड्याप्रमाणे जे रंग पालटले व ज्या कोलांट्या उड्या मारल्या त्या काय दर्शवितात ? राज्याभिषेकविधी करण्यास तो तयार नव्हता व त्याला तयार करण्यासाठी त्याच्यापुढे पैशाच्या राशी उभ्या कराव्या लागल्या. हे यावरून दिसत नाही काय ? ही कारणमिमांसा जर बरोबर असेल तर शिवाजी हा क्षत्रिय होता, हे गागा भटाने जो निर्णय दिला तो लाच घेतल्यानंतरच दिला, याबद्दल संशय नाही. (गागा भटाने जे पगडी पालट केले व ज्या कोलांड्या उड्या मारल्या जो वर उल्लेख केला आहे तो श्री.के. ठाकरे यांच्या 'ग्रामण्याचा साद्यत इतिहास' या पुस्तकात दिलेल्या माहितीवर आधारलेला आहे. ही माहिती कितपत विश्वसनीय आहे, हे सांगणे कठीण आहे, तथापि, हे मात्र कबूल केले पाहिजे की, गागा भटाने वेळोवेळी आपली पगडी फिरवून निरनिराळ्या वेळी मते प्रदर्शित केली होती. हे जर मान्य केले नाही तर शिवाजीच्या राज्याभिषेकाला जी विघ्ने उपस्थित झाली होती, ती कोणामुळे या मुद्याचा खुलासा करणे इष्ट आहे.

उदाहरणार्थ पुढील प्रश्न घ्या.

काशीहून रायगडला येऊन पोहचल्यानंतर गागा भटाने आपले मत बदलले की नाही आणि बदलले असेल तर ते कोणत्या कारणांमुळे ? रायगडला आल्यानंतर गागा भटाला कळून आले की, खुद्द शिवाजीचा मुख्य प्रधान मोरोपंत पिंगळे हा ब्राम्हण शिवाजीला क्षत्रिय मानावयास तयार नाही. मोरोपंत पिंगळे यांनी शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या विरूद्ध जे वातावरण उत्पन्न केले होते, ते पाहून गागा भटाने आपली पगडी फिरवून मोरोपंत पिंगळे याच्या सूरात सूर मिसळला. या बाबतीत गागा भट व मोरोपंत पिंगळे शिवाजीच्या राज्याभिषेकाला प्रथम कसून विरोध होता, पण थोड्याच दिवसात त्याने आले मत बदलले व तो शिवाजीच्या राज्याभिषेकाला उचलून धरू लागला. मोरोपंतांचे हे जे मतांतर झाले ते कशामुळे; बाळाजीला राजा म्हणून जाहीर करावे, असे गागा भटाने सुचविले होते. ही गोष्ट जर खरी असेल तर मोरोपंतामध्ये मतांतर का घडून आले, याचा खुलासा त्या गोष्टीवरून होता. बाळाजी हा कायस्थ होता. कायस्थ हे त्यावेळी ब्राम्हणांचे हाडवैरी होते. गागा भटाने बाळाजीला राजा करण्याची सुचना केली. तेव्हा मोरोपंताच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले गेले. बाळाजीला राजा मानण्यापेक्षा शिवाजीला राजा मानणे बरे असा मनात हिशेब करून मोरोपंताने शिवाजीच्या राज्याभिषेकाला टेकू दिला.

शिवाजीचे उदाहरण महत्वाचे आहे. याचे शेवटचे कारण हे की, दर्जा ठरविण्याच्या बाबतीत पूर्वी निर्णय स्वत:ला बंधनकारक आहेत, असे ब्राह्मण मानीत नसत, ते या उदाहरणावरून सिध्द होते. त्यांनी एकदा खटला निकालात काढला तरी तो खटला पुन: उपस्थित करून त्याच्यावर निराळा निर्णय देण्याचा अधिकार आहे, असे ब्राह्मण समजत असत. कारण, शिवाजी हा क्षत्रिय होता, हा जो निर्णय ब्राह्मणांनी दिला तो त्यांनी किती काळ पाळला ?

६ जून, १६७४ या दिवशी शिवाजीचा राज्याभिषेक झाला. तेव्हापासून त्याने नवे शक सुरू केले. तो राज्याभिषेक शक या नावाने ओळखला जातो. तो शक किती काळ पाळला गेला ? जोपर्यंत शिवाजी आणि त्याचे वंशज गादीवर बसून स्वत: राज्यकारभार पाहात होते, तोपर्यंत हे शक पाळले गेले. जेव्हा राज्यकारभाराचे सर्व अधिकार ब्राह्मण पेशव्यांच्या हातात गेले तेव्हा पेशव्यांनी असा हुकूम जाहीर केला की, हा शक व्यवहारातून बंद करावा (Sardesai, Marathi Riyasat 2nd p. 363 and Vaidya, Shivaji P.251). शिवाजीचा राज्याभिषेक शक बंद करून ब्राह्मण पेशव्यांनी मोगल बादशहांचे फसली शक सुरू केले. एवढे करून ब्राह्मण थांबले नाहीत, त्याच्याही पुढे त्यांनी मजल मारली. शिवाजी वंशज क्षत्रिय आहेत काय, असा प्रश्न उपस्थित करून त्यांनी पुन: वाद माजविला (याच्या पुढील मजकूर रावबहादूर डोंगरे यांच्या 'सिध्दांत विजय' या पुस्तकाच्या आधारे लिहिला आहे). ब्राह्मण शिवाजीचे मुलगे संभाजी व राजाराम या दोघांचे काही वाकडे करू शकले नाहीत. शिवाजीने या दोन मुलांची उपनयने वैदिक पध्दतीने ब्राह्मणांकडून

आपल्या हयातीतच करून घेतली होती. शिवाजीचा नातू शाहू याच्या बाबतीतही ब्राह्मणांना काही काळेबेरे करता आले नाही. कारण शेवटी त्यावेळी ब्राह्मणांच्या हातात राज्यकारभाराची सर्व सत्ता आली नव्हती. ज्या क्षणाला शाहूने आपली सार्वभौम राज्यकारभाराची सत्ता ब्राह्मण पेशव्यांच्या हातात दिली त्या क्षणाला शिवाजीचे वंशज क्षत्रिय नव्हते, असा गलगलाट करण्याला ब्राह्मणाला रस्ता मोकळा झाला. शाहूचा दत्तक पुत्र रामजी राजे हा शाहूनंतर गादीवर आला. तो अल्पवयी होता तोपर्यंत ब्राह्मण पेशवे त्याचे पालक होते. रामजी राजे याचे उपनयन केले होते की नव्हते, केले असेल तर ते वैदिक पध्दतीने केले होते काय, या प्रश्नाची समर्थक उत्तरे देण्यास काही पुरावा उपलब्ध नाही. रामजी राजे याच्यानंतर दुसरा शाहू गादीवर आला. दुसरा शाहू याला १७७७मध्ये दत्तक घेतले होते. दुसरा शाहू याचे उपनयन पेशव्यांच्या हुकुमान्वये पौराणिक विधीने करण्यात आले होते. (डोंगरे, प्रस्तावना, पा.६) दुसऱ्या शाहूचे उपनयन पौराणिक विधीने केले याचा अर्थ असा की, पेशवे दुसऱ्या शाहूला शूद्र मानत होते, कारण फक्त शूद्रांच्या बाबतीत सर्व विधी पौराणिक पध्दतीने करण्यात येतात. दुसऱ्या शाहूनंतर महाराज प्रतापसिंह हा १८०८ साली गादीवर आला. त्याचे उपनयन केले होते काय ? केले असेल तर ते वैदिक पद्धतीने केले की पौराणिक पद्धतीने याबद्दल ठाम मत देणे अशक्य आहे. तथापि एक गोष्ट मात्र नक्की माहीत आहे की, सांगलीच्या कायस्थांचा सामाजिक दर्जा काय आहे, यासंबंधी १८१७ च्या सुमारास करवीरचे शंकराचार्य यांनी असा निर्णय दिला होता की, 'कलियुगात क्षत्रिय अस्तित्वात नाहीत आणि शिवाजी, संभाजी किंवा शाहू हे क्षत्रिय होते, याबद्दलचा पुरावा दाखविणारे कागदपत्र त्यांच्या दप्तरात नाही.' (डोंगरे प्रस्तावना पा. ९). या निर्णयासंबंधी असे म्हणण्यात येते की, हा निर्णय शंकराचार्यांचा मुळचा नाही तर तो शंकराचार्यांच्या मूळच्या निर्णयात सांगलीच्या ब्राह्मण राजाने घुसडून दिलेला भाग आहे. ते काही का असेना, तो निर्णय म्हणजे शिवाजीचा वंशज म्हणून प्रतापसिंहाचा जो सामाजिक दर्जा होता त्या दर्जाला रोकठोक आव्हान होते. या निर्णयाचा विचार करण्याकरिता प्रतापसिंहाने सातारा येथे १८३० साली ब्राह्मणांची परिषद भरविली. या परिषदेतील ब्राह्मणांचे मताधिक्य असे पडले की, प्रतापसिंह क्षत्रिय होता. या निर्णयामुळे प्रतापसिंहाला शूद्राचे स्थान देण्याची जी आपत्ती आली होती ती टळली.

शिवाजीच्या वंशजांची दोन घराणी राज्य करीत होती; एक साताऱ्याला, दुसरे कोल्हापूरला. साताऱ्याच्या घराण्याला शूद्रपदी नेण्याचा ब्राम्हणांचा प्रयत्न फसला. हे पाहून त्यांनी आपला मोर्चा कोल्हापूरच्या घराण्याकडे वळविला. बाबासाहेब महाराज हे कोल्हापूरचे राजे होते. त्यांच्या कारकिर्दीत रघुनाथ शास्त्री पर्वते या नावाचा राजवाड्यातील पुरोहित होता. राजवाड्यातील सर्व विधी पौराणिक पद्धतीने करावेत, असा विचार पुरोहितांच्या डोक्यात शिरला. असे सांगण्यात येते की, पौराणिक पद्धतीने विधी न करण्याची सक्ती त्या पुरोहितावर करण्यात आली. बाबासाहेब १८८६ मध्ये

वारले. १८८६ ते १८९४ पर्यंत जे राजे झाले ते सर्व अल्पवयी होते. म्हणून राज्यकारभाराची सत्ता ब्रिटीशांच्या हातात होती. परलोकवासी शाहू महाराज यांनी १९०२ मध्ये पुरोहितावर असा हुकूम बसवला की, त्याने राजवाड्यातील सर्व विधी वैदिक पद्धतीने केले पाहिजेत. हा हुकूम मान्य करण्याचे पुरोहिताने नाकारले. उलट अंशी हे विधी पौराणिक पद्धतीनेच केले गेले पाहिजेत असा त्याने आग्रह धरला. पुरोहिताच्या या आग्रहाचा गर्भित अर्थ असा होता की, कोल्हापूरचे राज्यकर्ते क्षत्रिय नसून शूद्र होते. या प्रकरणात करवीर मठाचे शंकराचार्य यांनी जो भाग घेतला होता तो विशेष महत्वाचा होता. हे प्रकरण चालू होते तेव्हा मठाच्या गुरूने म्हणजे शंकराचार्याने शिष्य दत्तक घेतला होता. त्या शिष्याचे नाव ब्रम्हणाळकर होते. गुरूने शिष्याला मठाधिपतीचे सर्व हक्क दिले होते. प्रथमत: गुरू व शिष्य या दोघांनीही राजवाड्यातील पुरोहिताची बाजू घेतली. परंतु पुढे शिष्याने महाराजांच्या क्षत्रियत्वाला मान्यता दिली. गुरू पुरोहिताच्या बाहूला चिटकून राहिला. त्याने शिष्याला वाळीत टाकले. त्यानंतर काही दिवसांनी महाराजांनी स्वत:चा शंकराचार्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. (आता ते डॉ. कुर्तकोटी म्हणून ओळखले जातात.) परंतु त्यानेही महाराजाला दगा दिला.

शिवाजी क्षत्रिय होता, हे मान्य करण्यात आले होते. त्याच्या वैयक्तिक मोठेपणाकडे पाहून दर्जा शिवाजीला देण्यात आला नव्हता, हे उघड आहे. हा त्याला जो दर्जा दिला तो त्याच्या घराण्यात वंशपरंपरेने चालणारा होता. त्या दर्जाबद्दल शंका प्रदर्शित करण्याची कोणाची छाती नव्हंती. त्याच्या घराण्यातील एखाद्या वंशजाने त्या दर्जाला न शोभणारे असे काही अनिष्ट कृत्य केले तर तो दर्जा त्या घरातून नष्ट होऊ शकत होता. सामान्यत: तो दर्जा नष्ट होऊ शकत नव्हता. क्षत्रियाच्या दर्जाला न शोभणारे एखादे कृष्णकृत्य शिवाजीच्या एखाद्या वंशजाने केले होते, असा आरोप कोणीही केला नव्हता. असे असताही, शिवाजी व त्याचे वंशज क्षत्रिय होते असा ब्राम्हणांनी पूर्वी जो निर्णय दिला होता, तो निर्णय धुडकावून लावण्यासाठी ब्राम्हण पुन: पुढे सरसावले.

असे होण्याचे कारण हेच की, एखाद्या हिंदू माणसाचा सामाजिक दर्जा ठरविताना वाटेल तेव्हा वाटेल तो निर्णय देण्याचा, किंवा दिलेला निर्णय बदलण्याचा आपणाला अधिकार आहे अशी ब्राम्हणांची भावना होऊन बसली आहे. ब्राम्हण लोक एखाद्या क्षूद्र माणसाला क्षत्रिय बनवतील. ते एखाद्या क्षत्रिय माणसाला शूद्र ठरवून त्याला अधोगतीला नेतील. सामाजिक दर्जा ठरविण्याच्या बाबतीत ब्राम्हणांचे अधिकार अमर्यादित आणि निरंकश अशा स्वरूपाचे आहेत.

वर दिलेली उदाहरणे मुंबई प्रांतातून घेतली आहेत याबद्दल वाद नाही.(या उदाहरणातील प्रत्येकाची तपशीलवार माहिती श्री. के.सी. ठाकरे यांच्या 'ग्रामण्यांच्या साद्यंत इतिहास' या पुस्तकात आहे ती पहावी. हे पुस्तक १९१९ मध्ये प्रसिद्ध झाले होते. परंतु त्यातून जी तत्वे वेचून काढता येतात ती स्पष्ट आहेत. ती इतर प्रांतातील उदाहरणामध्येही पाहावयास मिळतील, ती येणेप्रमाणे) :-

(१) उपनयन करण्याचा अधिकार फक्त ब्राम्हणांनाच आहे. शिवाजी, प्रतापसिंह कायस्थ, पांचाळ आणि पवशे यांच्यापैकी कोणालाही आपले उपनयन ब्राम्हणेतराकडून व्हावे असे वाटत नव्हते.

(२) ब्राम्हण कोणाचे उपनयन करील व कोणाचे करणार नाही, हे सांगण्याचा अधिकार ब्राम्हणांचा आहे. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर ते असे की, एखाद्या जातीला उपनयनाचा अधिकार आहे किंवा नाही हाही निर्णय ब्राम्हणांकडेच.

(३) एखाद्याला उपनयनाचा अधिकार देण्याचा निर्णय ब्राम्हणाने प्रामाणिकपणे दिला असे समजू नये. तो निर्णय पैसे देऊन विकत घेता येतो. शिवाजीने गागा भटाचा निर्णय गागा भटाला पैसे देऊन विकत घेतला होता.

(४) ब्राम्हणाने एखाद्याला उपनयन नाकारले तर ते काही कायदेशीर किंवा धार्मिक कारणामुळे नाकारले असे समजू नये. असा नकार देण्यात ब्राम्हणांना काही कुटिल राजकारणाचे डावपेच टाकावयाचे असतात. ब्राम्हणांनी क्षत्रियांना उपनयन करण्याचे नाकारले याचे कारण हेच होते की राजकिय सत्ता आपल्या हातात ठेवण्यासाठी, ब्राम्हण व क्षत्रिय हे परस्परांचे प्रतिस्पर्धी म्हणून झगडत होते.

(५) उपनयन नाकारण्याबद्दलचा निर्णय दिला गेला तर त्याच्या विरूद्ध फेरतपासणी करावयाची असेल तर ती विद्वत परिषदेने नाकारावयाची आणि या परिषदेचे सर्व सभासद फक्त ब्राम्हणच असले पाहिजेत.

वरच्या स्तंभात जो उहापोह केलेला, यावरून हे स्पष्ट दिसून येईल की, उपनयन नाकारण्याचा अधिकार फक्त ब्राम्हणांच्या हातात होता. असला अधिकार ब्राम्हणांच्या हातात असता आणि सर्व ब्राम्हणेतरांच्या डोक्यावर मिरे वाटण्याची जबरदस्त हौस मनात असता ब्राम्हणांनी त्या सत्तेचा उपयोग केवळ शुद्रांच्या विरूद्ध केला, यात आश्चर्य मानण्यासारखे काही नाही.

✡✡✡✡✡